**<u>नि.दिवाणी दावा क्रं.३६/२०१५</u>**

**<u>नि. क्रं.१११</u>**

## :: प्रतिवादी क्र.९ करिता विधीज्ञ श्री. बी.व्ही. पाटील यांच्यामार्फत शपथेवर ज्यादा सरतपास.

१२. मला नमूद खरेदीखत दाखविल्यास मी ओळखू शकतो. आता मला खरेदीखत क्र.३३०/२०२१ दाखविले. हे तेच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यामधील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.११२** देण्यात येते. वादीने त्यांच्या वकिलांमार्फत मला नोटीस पाठविली होती. मी ती ओळखू शकतो. आता मला नोटीस दाखविली. ही तीच आहे. (प्रतिवादीला नोटीस पाठविल्याचे आणि मिळाल्याचे कबूल असल्याने त्यास निशाणी देणे योग्य होईल. सबब त्यास **नि.११३** देण्यात येते.) मी सदर नोटीसला उत्तर दिले होते. आता मला उत्तर दाखविले. हे तेच आहे. त्यावर माझ्या वकिलांची सही आहे. त्यामधील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.११४** देण्यात येते. आता मला पोस्टाची पावती आणि पोच पावती दाखविले. त्यामधील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यांना अनुक्रमे **नि.११५ व ११६** देण्यात येते.

१३. (वादीचे अधिवक्ता यांनी नि.दि.दा.क्र.४१२/१९९७ मधील हुकूमनामा, फेरफार क्र.५४९, फेरफार क्र.२३०५, फेरफार क्र.२३१६, गाव नमुना–८, सर्वे क्र.४१/२ चा ७/१२ उतारा, घर क्र.७३३ व ७४० चे नमुना–८ हे सार्वजनिक अभिलेखाचा भाग असल्याने व साक्षीदाराने त्याबाबत शपथपत्रामध्ये कथन केले असल्याने त्यांना निशाणी देण्याची विनंती केली. वादीचे अधिवक्ता यांनी नियमाप्रमाणे आदेश करण्यास सांगितले. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमाचे कलम १५७ मधील गृहीतकाप्रमाणे महसूल अभिलेख हा पुरावा म्हणून वाचता येतो. सबब त्यास

निशाणी देणे योग्य ठरेल. वादीचा युक्तिवाद स्वीकारला. उपरोक्त कागदपत्रांना अनुक्रमे **नि.क्र.११७ ते १२४** देण्यात येते.)

सरतपास पूर्ण.

**:: वादीकरिता उलटतपास अधिवक्ता श्री. जी.एस. बिरादार यांच्यामार्फत शपथेवर सुरू. ::**

१४. नागशेट्टी बिरादार यांना मी ओळखत नाही. त्यांना तीन मुले बालाजी, योगेश, बाबुराव ही आहेत. परंतु त्यांना दोन मुली असून दोन्ही मुलींचे नाव मला माहीत नाही. सदर दावा वंदना बिरादार व बाबुराव बिरादार यांनी दाखल केलेला आहे. मी दावा वाचला होता व समजून घेतला होता. बाबुराव हा दाव्यामध्ये प्रतिवादी आहे. हे म्हणणे खरे आहे की, नागशेट्टींना दोन मुली म्हणजे वादी वंदना आणि सोजरबाई आहेत. नागशेट्टीकडे किती सर्वे नंबरमध्ये किती जमिनी होत्या हे मला माहीत नाही. नागशेट्टी यांना दावा मिळकती कशा मिळाल्या हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकती वडिलोपार्जित आहेत.

१५. वादीच्या घरामध्ये कोण खर्च करतो किंवा त्यांना काय आर्थिक अडचण होती हे मला माहीत नाही. कथित वाटणीच्या वेळी मी हजर नव्हतो. वादी हे कथित तडजोड हुकूमनाम्याचे पक्षकार नाहीत व त्यांची त्याकरिता संमती घेतलेली नाही, याबाबत मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादींनी मला वाद मिळकतीबाबत वाद न्यायालयामध्ये प्रलंबित असल्याचे कळविले होते. हे म्हणणे खरे नाही की, मला वाद जमिनीच्या वादाबाबत माहिती असताना सुध्दा मी जमीन खरेदी केली. हे म्हणणे खरे

नाही की, मी आणि प्रतिवादींनी संगनमत करून वादींना त्यांच्या हक्कापासून डावलण्यासाठी जमिनीचे खरेदीपत्र केले. हे म्हणणे खरे नाही की, खरेदीपत्र बेकायदेशीर आहे.

१६. वादींना वाद मिळकतीमध्ये हिस्सा मागण्याचा हक्क नाही हे मी राणुबाई बालाजी बिरादार व विजयमाला बालाजी बिरादार यांनी वाटणीबाबत सांगितल्यावरून कथन केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादींना वाद मिळकतीमध्ये हिस्सा मागण्याचा हक्क नसल्याचे खोटे कथन केले. वादींनी त्यांच्या भावांना हिस्स्याची मागणी केली त्यावेळी मी हजर नव्हतो व मला त्याबाबत माहिती नाही. वादींनी त्यांच्या भावांना हिस्सा मागितला हे मला गावकऱ्यांनी सांगितलेले नाही. आता मला शपथपत्रातील परिच्छेद क्र.५ मधील मजकूर वाचून दाखविला. हे म्हणणे खरे नाही की, त्यामधील मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादीला हिस्सा मिळालेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र दाखल केले.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत सा.वा.दा.ख.व.ब.अ.क.केले.

( श.अ. सुरजुसे ) ( श.अ. सुरजुसे )
दिवाणी न्यायाधीश क. स्तर, **देवणी**. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, **देवणी**.
दि.१५/०४/२०२६.